Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P032

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# गोंदिया जिल्ह्यातील ढीवर समाजाचा परंपरागत व्यवसाय, व्यवसायिक ज्ञान आणि व्यवसायात आलेले परिवर्तन

**कौस्तुभ म. चुटे**
समाजशास्त्र विभाग,
रा.तु.म.ना.वि,नागपूर.

**सारांश**

सदर संशोधन अभ्यास महाराष्ट्रातील गोंदिया जिल्ह्यातील ढीवर समाजाच्या पारंपारिक व्यवसाय, व्यवसायिक ज्ञान आणी व्यावसायिक पद्धतीतील बदलांवर लक्ष केंद्रित करते.

ढीवर समाज पारंपरीकपणे त्यांच्या उपजीविकेसाठी नद्या, तलाव आणि डबके यासारख्या जलस्त्रोतांवर अवलंबून आहे. त्यांच्या प्राथमिक व्यवसायांमध्ये मासेमारी, कमळ, शिंगाळा, पाण्यातील फळांचे संग्रह, टरबूज आणि खरबूज, पर्यटकांना बोटीवर फिरवणे आणि पाण्याशी संबंधित व्यापार समाविष्ट आहे. त्यांच्या जीवनपद्धतीतील जलपरिसंस्थेचे सखोल निरीक्षण, मासेमारीच्या ऋतूचक्रांचे ज्ञान, माश्यांच्या प्रजातींची ओळख, नैसर्गिक संसाधनाचे शाश्वत उपयोग, सामुदायिक सहकार्य आणी सामुहिक व्यवस्थापन या घटकांचा समावेश आढळतो – जे भारतीय ज्ञान परंपरेतील लोकपरंपरा, लोकज्ञान, स्थानिक पर्यावरणीय ज्ञान आणि सामुदायिक संसाधन व्यवस्थापन संकल्पना यांच्याशी घट्ट संबंधित आहे.

तथापि, अलीकडच्या दशकात आधुनिकीकरण, पर्यावरणीय ऱ्हास, धोरणात्मक बदल आणि सामाजिक-आर्थिक बदलांमुळे या पारंपारिक उपजीविकेत लक्षणीय बदल झाले आहे. अभ्यासात असे आढळून आले आहे कि, ढीवर समाजाची तरुण पिढी रोजगार आणि शिक्षणाच्या नवीन प्रकारांशी अधिकाधिक जुळवून घेत आहे, तर पारंपारिक मासेमारी पद्धती कमी होत आहेत. कारण पारंपारिक मासेमारी करणाऱ्या पिढीला वाटते कि त्यांच्या मुलांचे भविष्य कारकीर्द बळकट होण्यासाठी त्यांनी शिक्षण करून चांगले रोजगार प्राप्त करावे. 'आम्ही जे कष्ठ करतो ते आमच्या मुलांनी करू नये' या विचाराखेरीज ढीवर समाजातील पालक त्यांच्या मुलांना पारंपारिक मासेमारी व्यवसाय सोडून इतर व्यवसाय किंवा नौकरी करण्याची इच्छा बाळगतात.

सदर संशोधन वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक स्वरूपाचे आहे. जे गोंदिया जिल्ह्यातील १२ कुटुंबांच्या उत्तरदात्यांच्या नमुन्यावर केले गेले आहे. मुलाखती, प्रश्नावली या प्राथमिक आणि शासकीय अहवाल व मागील संबंधित संशोधन अभ्यासांसारख्या दुय्यम स्त्रोतांद्वारे तथ्य संकलन करण्यात आले आहे. तथ्य विश्लेषणासाठी chi-square चाचणी या सांखीकीय साधनांचा वापर करण्यात आला आहे.

अभ्यासावरून असे दिसून आले आहे कि, आधुनिकीकरण तसेच नागरीकरण व जागतिकीकरणांमुळे ढीवर समाजाच्या पारंपारिक व्यावसायिक प्रणालीमध्ये लक्षणीय बदल झाला आहे. पारंपारिक कौशल्ये आणि पर्यावरणीय ज्ञान मौल्यवान असले तरी, आर्थिक सक्ती आणि सामाजिक बदलांमुळे उपजीविकेत विविधता आली आहे.

**बीजशब्द :-** ढीवर समाज, गोंदिया जिल्हा, पारंपारिक व्यवसाय, आधुनिकीकरण, व्यावसायिक ज्ञान, जागतिकीकरण, उपजीविकेतील परिवर्तन, मत्स्यव्यवसाय, सामाजिक-आर्थिक विकास.

**परिचय**

महाराष्ट्राचे पूर्व द्वार म्हणून ओळखला जाणारा जिल्हा म्हणजेच गोंदिया जिल्हा. हा जिल्हा स्वतःमध्ये जैवविविधतेने नटलेला आहे. जिल्ह्याच्या मुख्य वैशिष्ट्यांमध्ये भाताच्या उत्पादनासोबातच तलावांची संख्या भरपूर आहे. प्रामुख्याने गोंदिया जिल्ह्याला तलावांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाते.

गोंदिया जिल्ह्यामध्ये तलावांवर अवलंबून असलेल्या भाताच्या शेती बरोबर मासेमारीचा व्यवसाय भरपूर प्रमाणात होते. जिल्ह्यात मासेमारीचा व्यवसाय ढीवर समाजातील लोक करतात. ढीवर समाजातील लोक तळ्यातील पाण्यात अवलंबून असलेले इतर व्यवसाय जसे कमळ, कमळाचे देठ (कमळ काकडी), शिंगाडे, कमळ गट्टा, कमळाचे कांदे, कोकोंबा इत्यादी स्वरुपात असलेल्या कमळाच्या पदार्थांना तळ्यातून गोळा करून त्यांना बाजारात विकतात. खरबूज आणि  टरबूजचे उत्पादन करणे, पर्यटकांना बोटीवर फिरवणे अशा प्रकारे ढिवर समाजातील लोक आप-आपल्या परीने व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करतात.

महाराष्ट्रामध्ये गोंदिया जिल्ह्यातील ढीवर समाज पारंपारिकपणे मासेमारी, नौकाविहार व जलचर उत्पादनांचे संकलन आणि विक्री यासारख्या पाण्यावर आधारित व्यवसायांशी जवळून संबंधित आहे. हा समुदाय ऐतिहासिकदृष्ट्या नद्या, तलाव आणि जलाशयांजवळ राहत आहे, उपजीविकेसाठी नैसर्गिक जलस्रोतांवर अवलंबून आहे. त्यांच्या पारंपारिक व्यवसाय पद्धतींमध्ये स्वदेशी अवजारांनी मासेमारी, पाण्यातील सिंघाडा लागवड, कमळाच्या देठ गोळा करणे आणि वाहतूक व फेरीसाठी ग्रामीण बोटी चालवणे यांचा समावेश आहे.

पिढ्यानपिढ्या, ढीवर समुदायाने जलीय परिसंस्था, हंगामी माशांच्या हालचाली आणि पारंपारिक संवर्धन पद्धतींचे सखोल ज्ञान विकसित केले आहे.

ढीवर समाज हा महाराष्ट्रातील पारंपरिक मासेमारी करणारा समाज आहे. गोंदिया जिल्ह्यातील नद्यांमध्ये, तलावांमध्ये आणि जलाशयांमध्ये पिढ्यान्पिढ्या मत्स्यव्यवसाय करून हा समाज आपला जीवन जगत आला आहे. समाजाचे पारंपरिक ज्ञान, नैसर्गिक संसाधनांची समज आणि व्यावसायिक कौशल्ये ही त्यांची खास वैशिष्ट्ये आहेत. ढीवर समाजाचा पारंपरिक व्यवसाय केवळ उपजीविकेपुरता मर्यादित नसून, तो त्यांच्या सांस्कृतिक ओळखीचा भाग बनला आहे. त्यांच्या व्यवसायातून निर्माण झालेले व्यावसायिक ज्ञान केवळ कौशल्य नव्हे, तर पिढ्यान-पिढ्यांनी आत्मसात केलेले एक लोकज्ञान आहे. ज्यात पर्यावरणाचे संवर्धन, जलस्रोतांचा शाश्वत वापर आणि सामाजिक सहकार्य या घटकांचा समावेश आहे.

ढीवर समाजाला आपले पारंपरिक व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाचा स्वीकार, समुदाय स्तरावर कौशल्य प्रशिक्षण आणि स्थानिक सहयोगी संरचना मजबूत करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे मार्ग आर्थिक समावेशक, सांस्कृतिक जतन आणि सामाजिक प्रतिष्ठा या सर्वांचा संगम साधू शकतात. मात्र गेल्या काही दशकांत आधुनिकीकरण, पर्यावरणीय बदल, सरकारी धोरणांतील बदल व सामाजिक संरचनेतील उलथापालथी यामुळे या समाजाचे पारंपरिक व्यवसायांमध्ये लक्षणीय परिवर्तन घडून आले आहे. पारंपरिक रोजगारांवर आलेल्या मर्यादा, शिक्षणाची अपुरी पातळी यामुळे ढीवर समाजाला नवे मार्ग शोधावे लागत आहेत. पण बदलत्या काळानुसार जसे युग आधुनिकीकरणाचे अनुकरण करत आहे, तसे लोकांना त्यांच्या व्यवसायावर परिणाम होतांनी दिसत आहे. यापैकी एक परिणाम तव्यातील व्यावसायिकांना सुद्धा भोगावे लागत आहे. त्याचं उदाहरण म्हणजे शासनाने मत्स्यव्यवसायिकांच्या शासन नर्णय योजनेमध्ये माजी-मालगुजारी तलाव व इतर योजनेतून केलेला हस्तक्षेप आहे.

या संशोधनाचा उद्देश म्हणजे ढीवर जातीच्या जीवनात पारंपारिक व्यवसायांची सामाजिक-आर्थिक भूमिका आणि कालांतराने या पद्धती कशा विकसित झाल्या आहेत याचा शोध घेणे आहे. माशांच्या संख्येत घट, यांत्रिकीकृत मासेमारीपासून स्पर्धा व बाजारपेठेतील मर्यादित प्रवेश आणि सरकारी मदत यासारख्या आव्हानांचे परीक्षण करताना त्यांच्या स्वदेशी ज्ञान प्रणालींचे जतन करण्याचे महत्त्व अधोरेखित करते. या आव्हानांना न जुमानता पारंपारिक व्यवसाय पद्धती, समुदायाची ओळख व संस्कृती आणि अर्थव्यवस्था टिकवून ठेवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. बदलत्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत ढीवर जातीच्या उपजीविकेचे संरक्षण आणि वाढ करण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेप आणि कौशल्य विकास उपक्रमांची आवश्यकता यावर हे निष्कर्ष अधोरेखित करते.

**संशोधन प्रश्न –**

१) गोंदिया जिल्ह्यातील ढीवर समाजाचा पारंपारिक व्यवसाय टिकून आहे का?
२) ढीवर समाजाच्या पारंपारिक व्यवसायामध्ये परिवर्तन होण्यामागची करणे कोणती आहेत?

**संशोधन चर्चा –**

गोंदिया जिल्ह्यातील ढीवर समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनपद्धतीतील बदलांचे अध्ययन करणे हे वर्तमान काळात महत्वाचे आहे. आधुनिकीकरण, शिक्षण, रोजगाराच्या संधी, शासकीय योजना आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेमुळे ढीवर समाजाचा व्यवसाय, परंपरा, सांस्कृतिक मूल्य आणि जीवनशैलीवर लक्षणीय परिणाम होत आहे. या स्थितीत त्यांचे पारंपारिक व्यवसाय टिकून राहिले आहेत का, की त्यांनी नवीन व्यवसायस्वरूप स्वीकारले आहेत, हे जाणून घेणे महत्वाचे ठरते.

सदर संशोधनामुळे पुढील काही गोष्टींची समज प्राप्त होऊ शकते; जसे की, ढीवर समाजाच्या पारंपारिक जीवनशैलीचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने करता येईल. आधुनिकीकरणामुळे झालेल्या बदलांची दिशा व स्वरूप स्पष्ट होईल. शिक्षण, शासनाच्या योजना आणि सामाजिक जाणीव यांनी समाजाच्या आर्थिक प्रगतीवर कसा प्रभाव टाकला आहे, हे समजता येईल. ढीवर समाजाच्या विकासासाठी भविष्यात कोणत्या धोरणांची गरज आहे, हे निश्चित करण्यास मदत होईल. समाजाच्या सांस्कृतिक व व्यावसायिक ओळखीचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुचवता येईल.

व्यतिरिक्त ढीवर समाजाच्या वर्तमान स्थितीचे परीक्षण करतांना पुढील चार महत्त्वाचे विश्लेषणीय आयाम पुढीलप्रमाणे उलगडतात:

(अ) पर्यावरणीय परिसंस्था आणि लोकज्ञानाचे संरक्षण :-

ढीवर समाजाने शतकानुशतके "किती मासे पकडायचे आणि किती सोडून द्यायचे" याचे तंतोतंत ज्ञान विकसित केले होते. हे शाश्वत जलसंसाधन व्यवस्थापनाचे उत्तम उदाहरण मानले जाते.

आपण समाजाचे पारंपरिक पद्धती आणि त्याचे उद्देश पाहूया :- १) माशांच्या प्रजनन काळात तळे निषिद्ध ठेवणे याचे उद्देश म्हणजे माशांचे अस्तित्व टिकवणे हे होते, २) लहान मासे परत सोडणे याचे उद्देश म्हणजे भविष्यातील संसाधनांचे संवर्धन करणे होय, ३) जाळीचे माप ठरावीक ठेवणे याचे उद्देश म्हणजे अतिप्रमाणात शिकार टाळणे होय. आणि सध्या आधुनिक व्यावसायिक मासेमारीत ही संवर्धनात्मक नैतिकता हळूहळू लोप पावत आहे, ज्यामुळे पर्यावरणीय संतुलन धोक्यात आहे.

(ब) आर्थिक संक्रमण आणि उपजीविकेची विविधता :-

पूर्वीच्या काळात जलस्रोताचे महत्व म्हणजे उपजीविका आणि सामाजिक सुरक्षा अशी होती. आणि सध्याच्या काळात त्याचे परिवर्तन स्वरूप आर्थिक स्पर्धा आणि सरकारी नियंत्रणामध्ये झाले.

बदलाची कारणे: 1) जलाशय भाडे धोरणांमुळे म्हणजेच केंद्र व राज्य शासनाचे मा.मा तलाव (माजी मालगुजारी तलाव) या धोरणामुळे मध्यम व स्थानिक मच्छीमारांवर मोठ्या व्यापारी संस्थांचे वर्चस्व वाढले आहे. याचे कारण स्वतः ढीवर समाजातील लोक आहेत, जे लोक त्यांच्या मुलांना भविष्यात पारंपारिक मासेमारी व्यवसाय करण्याची अनुमती प्रदान करत नाही, यामुळे तलावातील मासेमारीची स्ध्यस्तिथी पाहत शासनाने माजी-मालगुजारी तलाव हे धोरण तलाव जिवंत ठेवण्यासाठी तयार केले आहे. याचा परिणाम असा झाला कि मोठ्या व्यापारांनी पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या लोकांनाच मजूर बनवून त्या तलावात मासेमारी व्यवसाय सुरु केले आहे. ज्याचे ढीवर समाजावर आर्थिक व उपजीविकेचे संकट वाढले आहे.

2. आधुनिकीकरणामुळे शिक्षण घेणाऱ्या लोकांच्या संखेत वाढ होतांना दिसत आहे, यामुळे सर्वच तरुण पिढीची रोजगारविषयक व व्यावसायिक महत्त्वाकांक्षा वाढली आहे. तथ्य संकलन करतांना असे दिसून आले आहे कि ढीवर समाजातील बहुतांश तरुण पिढी हे आपले पारंपारिक व्यवसाय सोडून इतर रोजगार किंवा व्यवसायाकडे वळले आहेत. त्यांना आपल्या पारंपारिक मूल्यांशी काहीच जवळीक नाही आहे.

3. जागतिकीकरणामुळे शहरांच्या वाढत्या बाजारांची ओढ पाहता ढीवर समाजाच्या व्यवसायाला अजूनपर्यंत स्थायी बाजारपेठ उपलब्ध नाही. त्यांना अस्थायी स्वरूपाची विक्रीची जागा असल्यामुळे रोजच्या असंतुलित आर्थिक क्रियेला सामोरे जावे लागते. ज्याचे परिणाम समाजाच्या उपजीविकेवर होत आहे. आपल्याला प्रत्येक शहरात जे मत्स्य बाजारपेठ दिसते त्यात पारंपारिक मासेमारी करणारा समाज नसून ते दलालयुक्त दुकान असते. आधुनिकीकरणामुळे ऑनलाईन विक्री सेवा सुरु झाली आहे, हे सुद्धा समाजाच्या स्थानिक व्यावसायिक लोकांवर परिणाम घडवून आणते. यामुळे समाजात प्रतिस्थापीत उपजीविका वाढल्या आहेत.

समाजावर याचे परिणाम पुढीलप्रमाणे झाले :

१) पारंपरिक सामूहिक अर्थव्यवस्थेऐवजी व्यक्तिकेंद्री अर्थव्यवस्था उभी झाली.
२) समुदायातील सामूहिक संबंध आणि पारिवारिक सहकार्य घटले.

(क) सांस्कृतिक ओळखीतील मूल्य संक्रमण :-

ढीवर समाजातील उत्सव, देवस्थाने, जलपूजन, वैवाहिक परंपरा अजूनही अस्तित्वात असल्या तरी त्यांची आध्यात्मिक खोली कमी होत आहे आणि औपचारिकता वाढली आहे. यातून दिसते की परंपरा संपत नाही, मात्र तिचे सादरीकरण बदलत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे नागरीकरण होय.

समाजामध्ये अजूनही आपल्या पोट-जाती मध्येच लग्न करण्याची संकल्पना दृढ आहे. पण बदलत्या काळानुसार सांस्कृतिक मूल्यांच्या सामोरे जावे लागत आहे.

(ड) सामाजिक गतिशीलता आणि सत्ता-संबंध :-

पूर्वीच्या काळात ज्याच्याकडे मासेमारीचे पारंपारिक ज्ञान आणि कौशल्य असायचे, त्याच्याकडे समाजाचे किंवा सामुहिक नेतृत्व राहत होते. पण सध्यस्तिथीत ज्याच्याकडे भांडवल आणि परवानगी हक्क आहे, त्याच्याकडचे नेतृत्व बळकट आहे. आणि आज तोच या पारंपारिक मासेमारी करणाऱ्या समाजावर आपले अधिकार बजावत आहे.

म्हणजेच आज सामाजिक सत्ता हि "ज्ञानाधारित" वरून "भांडवलाधारित" रचनेत परिवर्तित झाली आहे. ढीवर समाजाचे जलाधारित ज्ञान हे भारतीय पर्यावरण संवर्धनाचे, शाश्वत विकासाचे आणि स्थानिक ज्ञान पद्धतींचे अमूल्य वारसास्थान आहे. तरी व्यवसायातील बदल अपरिहार्य आहे, परंतु या बदलाचा मार्ग परंपरा जतन आणि आधुनिक साधनांचा समन्वय असा असला पाहिजे. तरच ढीवर समाजाचे पारंपारिक ज्ञान हे व्यावसायिकदृष्ट्या पिढ्यानपिढ्या आत्मसात करण्याची संकल्पना टिकून राहील.

**निष्कर्ष –** गोंदिया जिल्ह्यातील ढीवर समाजाचा परंपरागत व्यवसाय, व्यावसायिक ज्ञान आणि व्यवसायात आलेले परिवर्तन अभ्यासण्यासाठी समाजाची संस्कृती, लोकज्ञान, सांस्कृतिक मूल्य, त्यांची जीवनशैली समजून घेणे महत्वाचे ठरते. सध्याची परिस्थिती पाहता समाजामध्ये पारंपारिक व्यवसाय करण्याची मनस्थिती आहे का, समाजातील किती कुटुंब तव्यातील पाण्यात व्यवसाय करत आहेत, किती कुटुंब इतर व्यवसाय करतात, समाजामध्ये कितपत लोकांना व्यवसायिक ज्ञान लाभलेले आहे, त्यांना त्यांच्या पारंपारिक व्यवसायाबद्दल परिपूर्ण ज्ञान आहे का, आणि त्यांच्या व्यवसायात कोणत्याप्रकारचे बदल झालेले दिसत आहेत.

अशाप्रकारच्या सर्व बाबींचा विचार करून त्यांच्या वास्तविक जीवनातील किंवा व्यवसायामध्ये आलेले परिवर्तन शोधण्यासाठी संशोधकाने गोंदिया जिल्ह्यातील १२ कुटुंबाकडून तथ्यांच्या आधारावर शोध घेतले कि, जिल्ह्यातील ढीवर समाजाचे परंपरागत व्यवसाय हे कालांतराने पूर्णपणे नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. याचे मुख्य कारण म्हणजे ढीवर सामाजाव्यतिरिक्त इतर लोक व्यवसाय म्हणून मासेमारी सुद्धा करतात. तलावांचे मोठ्या प्रमाणात होणारे खाजगीकरण ज्याचे माजी मालगुजारी तलावांची निर्मिती करून शासन ढीवर समाजाचे पारंपारिक व्यवसायाचे परिवर्तन करत आहे. जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या आधुनिकीकरण, नागरीकरण, शिक्षण प्रणालीतील बदल, शासकीय हस्तक्षेप, ऑनलाईन सेवा, समाजातील मुलांचे भविष्य कारकीर्द, मुलांना पारंपारिक व्यवसायातून मुक्त करण्याची अपेक्षा, बाजारपेठेचा विस्तार  इत्यादी. या सर्व घटकांना लक्षात घेऊन संशोधनाचे निष्कर्ष या तथ्यांवर पोहचला आहे कि गोंदिया जिल्ह्यातील ढीवर समाजाचा परंपरागत व्यवसाय कालांतराने नष्ट होऊ शकतो, उर्वरित व्यावसायिक ज्ञानाला जतन करणे हि काळाची गरज आहे व व्यवसायात आलेल्या परिवर्तनामुळे समाजातील कुटुंबियांना उपजीविकेचा आणि सांस्कृतिक मुल्यांचा वारसा जपून ठेवण्याचा मोठा प्रश्न निर्माण होत आहे.

## संदर्भ ग्रंथसूची

गाडगील, माधव.&बेर्केस, फिक्रेट.(१९९१). ट्रेडिशनल रिसोर्स मॅनेजमेंट ॲण्ड इंडिजीनियस नॉलेज.जर्नल ऑफ सस्टेनेबल डेव्हलप्मेंट.

गुप्ता, अनिल.&सिंग.(२००३).ट्रेडिशनल इकॉलोगी नॉलेज ॲण्ड लोकल लाईव्हलीहूड. TERI पब्लिकेशन.

देव, वि.रा.(२०१०). भारतीय ज्ञानपरंपरा आणि विज्ञान. डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

देशमुख, व्ही.आर.(२००९).महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसाय.महाराष्ट्र शासन मत्स्य विभाग.

पाटील, टी.एस.(२०१५).महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्था. फिरोजसन्स प्रकाशन,नागपूर.

राजनकर, मनीष.(२०१९). मालगुजारी तज्ञ प्रणाली, तलावातील पारंपारिक मत्स्यव्यवसाय व त्यातील सामाजिक बदल- एक अभ्यास.LEISA India article.

## संदर्भ सूची

(२०१९). ढीवर समाजाचा पारंपारिक व्यवसाय, उपजीविका आणि सामाजिक-आर्थिक अडचणीचा अभ्यास.इंटरनॅशनल जर्नल ऑफ मल्टीडिसिप्लीनरी अप्रोच ॲण्ड स्टडीज.

वेलणकर, र.अ.(२०११).ढीवर समाजाच्या पारंपारिक व्यवसायाचा सामाजिक इतिहास व कामाचे स्वरूप.शोध प्रबंध.

https://en.wikipedia.org